शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्तप्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका


(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष : बारावे अंक : तेहतीसावा

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

# भिन्नभाषिक साहित्याची मराठी भाषांतरे



कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

**भिन्नभाषिक साहित्याची मराठी भाषांतरे**

२३. अनुवादित आत्मचरित्रांचे मराठी साहित्यातील स्थान - शितल सालवाडगी १७८
२४. एस. एल. भैरप्पा यांच्या अनुवादित कादंबऱ्यांची चिकित्सा - डॉ. प्रियांका कुंभार १८४
२५. सुधा मूर्ती यांचे अनुवादित साहित्य - प्रा. नमिता पाटील १९३
२६. लोगोथेरपी ते इकिगाई : भाषांतराचा प्रवास -प्रा. प्रकाश कांबळे १९८
२७. 'प्रभाव' आणि मराठी-कन्नड भाषांतरित साहित्यकृती यांचा तौलनिक सहसंबंध- डॉ. विद्या नावडकर २०९
२८. मराठीतील अनुवादित, रुपांतरीत, भाषांतरीत नाटकांची परंपरा - डॉ. राजश्री पोवार २१८
२९. शरच्चंद्र चटर्जी यांच्या मराठी अनुवादित कादंबरीतील स्त्रीचित्रण - प्रा. डॉ. प्रदीप पाटील २२६
३०. भाषांतरित प्रवासवर्णने : एक दृष्टिक्षेप - डॉ. वैशाली गुंजेकर २३९
३१. अनुवाद आणि अनुवादाचे स्वातंत्र्य (हयवदन नाटकाच्या अनुषंगाने)- डॉ. बळवंत मगदूम २४६
३२. गिरीश कार्नाडांच्या अनुवादित साहित्याचे विशेष - डॉ. संजय मेस्त्री २५५
३३. टागोरांच्या कथावाङ्मयातील स्त्रीचित्रण - डॉ. प्रवीण लोंढे २६२
३४. 'धम्मपदा'ची मराठी भाषांतरे आणि समकालीनता - डॉ. अश्विनी तोरणे २७०
३५. भारतीय इंग्रजी साहित्यिक आर. के. नारायण - डॉ. बाळासो सुतार २७७
३६. सआदत हसन मंटो यांची एकमेव कादंबरी बगैर उनवान -डॉ. यशवंत चव्हाण २८६
३७. भाषांतर आणि तौलनिक साहित्य - प्रा. प्रदीप चोपडे २९२
३८. अनुवाद शास्त्र की कला - प्रा. विजयकुमार शिंदे ३००
३९. 'स्त्री मेरे भीतर' काव्यसंग्रहाच्या अनुवादाची आशयनिष्ठ मीमांसा - प्रा. डॉ. विजया पवार ३०४
४०. जर्मन, रशियन व इंग्रजीमधील भाषांतरित कथा - डॉ. चंद्रकांत कांबळे ३१२
४१. 'ज्ञानोदय'ची कामगिरी : भाषांतर - डॉ. महादेव जाधव ३२०
४२. कविता महाजन यांचे अनुवाद संपादनाचे कार्य -श्री. विलास सुर्वे ३२९


*ISSN No. 2319-6025*

# शरच्चंद्र चटर्जी यांच्या मराठी अनुवादित कादंबरीतील स्त्रीचित्रण

प्रा. डॉ. प्रदीप पाटील

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## प्रास्ताविक

१९२० ते १९५० या कालखंडातील अभिरुचीच्या जडणघडणीचा विचार करीत असताना बंगालीतून अनुवाद रूपाने मराठीत आलेल्या व लोकप्रिय ठरलेल्या शरच्चंद्र चटर्जी यांच्या कथात्म साहित्याचा विचार आपल्याला सर्वप्रथम करावा लागतो. शरच्चंद्र चटर्जी यांच्या मराठीतील अनुवादित कथात्म साहित्यातून अभिव्यक्त होणाऱ्या सामाजिक व राजकीय जाणिवा, त्यांच्या कादंबऱ्यांना लाभलेले विविध सांस्कृतिक संदर्भ, त्यांच्या कथात्म साहित्यातून आलेला ध्येयवादी व जीवनवादी दृष्टिकोन मराठी वाचकांच्या मनाला भुरळ घालतो. त्यांच्या अनुवादित कथात्म साहित्यातील अनुभवविश्व प्रभावीपणे मांडणारी भाषा वाचून मराठी वाचक प्रभावित झालेले दिसतात. शरच्चंद्र चटर्जी यांच्या मराठीत अनुवादित झालेल्या साहित्याचा विचार करता त्यांच्या एकूण २१ कादंबऱ्या आणि १२ दीर्घकथा मराठीत अनुवादित झालेल्या पाहावयास मिळतात. त्यांचे हे साहित्य प्रामुख्याने मामा वरेरकर, वि. सी. गुर्जर, यशवंत तेंडुलकर, शं. बा. शास्त्री, श्री. रा. मराठे, प. स. देसाई, पी. बी. कुलकर्णी, मृणालिनी गडकरी यांनी मराठीत अनुवादित केले आहे. आजही त्यांच्या कथा, कादंबऱ्यांचे मराठीत अनुवाद होताना दिसतात. उदाहरणार्थ १९१७ साली लिहिलेल्या 'देवदासफ या कादंबरीचा मृणालिनी गडकरी यांनी इ. स. २००४ मध्ये अनुवाद करून शरच्चंद्र चटर्जी यांचे साहित्यिक म्हणून असणारे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. शरच्चंद्र चटर्जी हे बंगाली साहित्यिक असले तरी त्यांच्या मराठीत अनुवादित झालेल्या साहित्याने मराठी साहित्याच्या अभिरुचीच्या जडणघडणीत मोलाची कामगिरी बजावली आहे. शरच्चंद्र चटर्जी यांचे साहित्य मराठीबरोबरच विविध भारतीय भाषांमध्येही अनुवादित झाले आहे, होत आहे. त्यांच्या 'देवदास', 'सव्यसाची', 'श्रीकांतसारख्या कादंबऱ्या इतर नऊ भारतीय भाषांमध्ये अनुवादित झालेल्या आहेत. त्यांच्या सामाजिक, राजकीय कथा, कादंबऱ्या तत्कालीन काळातील सामाजिक, राजकीय विचारसरणीची पार्श्वभूमी उलगडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. अशा महान

 *ISSN No. 2319-6025*

साहित्यिकाकडे आणि त्यांच्या मराठीतील अनुवादित साहित्याकडे लक्ष देणे, त्यांच्या साहित्याचे वेगळेपण शोधून काढणे इष्ट ठरते.

१.

शरच्चंद्र चटर्जी यांच्या व्यक्तिचित्रणाची वैशिष्ट्ये लक्षणीय आहेत. एकतर आपल्या प्रमुख पात्रांचं वर्णन ते सलगपणानं, एका दमात किंवा एक-दोन परिच्छेदात करून मोकळे होत नाहीत. नायकाचं किंवा नायिकेचं समग्र चित्र एकदमच वाचकांना सादर करण्याचा मोह ते कटाक्षाने टाळतात. विविध संदर्भातून व्यक्तींचे स्वभावविशेष प्रकट होण्यासाठी ते वाचकांना पुरेसा अवसर देतात. त्यामुळे व्यक्तिरेखा व तिचा स्वभावपट हळूहळू उलगडत जातो. तसेच ते प्रत्यक्ष वर्णन आणि सरळ संवाद यांच्या बरोबरीने पूर्वस्मृतीच्या निवेदनातून पात्रांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकतात. कधीकधी ती संबंधित व्यक्तीच जुन्या आठवणींना उजाळा देते. तर कधी एखादं गौण पात्रही त्या व्यक्तीच्या गतजीवनातील लक्षणीय प्रसंगाचे कुशलतेने कथन करताना दिसते. त्यांची ही 'फ्लॅश बॅक' निवेदनपद्धती त्या घटनांच्या संगतीत चपखलपणाने सामावते. त्यामुळे पूर्वस्मृतीचं कथन अगदी नैसर्गिक वाटू लागते. शरच्चंद्र चटर्जी यांच्या व्यक्तिरेखांचे विशेष सांगताना गंगाधर गाडगीळ म्हणतात,

"शरदबाबूंच्या साहित्यात मनुष्याच्या आत्म्यालाच हात घातलेला आहे. शरदबाबू आपल्या व्यक्तिरेखांच्या मनाचे चित्रण करताना दिसत नाहीत, तर त्यांनी सरळ त्यांच्या आत्म्यालाच हात घातला आहे. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा वाचकाच्या मनावर खोल असा स्पर्श करताना दिसतात."[१]

शरदबाबूंच्या साहित्यातील एकूण व्यक्तिचित्रण पाहिले असता त्यातील बहुसंख्य व्यक्तिरेखा या हळव्या स्वभावाच्या असलेल्या दिसतात. काही व्यक्तिरेखा हेकेखोर आहेत, काही व्यक्तिरेखा संशयी आहेत तर काही व्यक्तिरेखा आततायी स्वभावाच्या आहेत. असे असले तरी त्यांच्या सर्व साहित्यात नायक, नायिका आणि त्यांच्याविरोधी खलनायक असे सूत्र प्रभावाने दिसते. परंतु शरदबाबूंच्या साहित्यातील नायक, नायिका कधीही खलनायकाचा तिटकारा करताना दिसत नाहीत. खलनायकांना कधीही आपल्या जीवनातून हुसकावून लावताना दिसत नाही. याउलट नायक खलनायकांना आपल्या जीवनाचाच एक भाग म्हणून स्वीकारताना दिसतात. मुळातच शरदबाबूंनी खलनायकांच्या चित्रणात कोठेही टोकाची भूमिका घेतलेली दिसत नाही.

शरदबाबूंच्या व्यक्तिचित्रणाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. ते म्हणजे

शरदबाबू व्यक्तिरेखांच्या जीवनात शरीरसुखांना फारसे महत्त्व देत नाहीत. खाणे, पिणे, कामवासनेची पूर्ती, दारूची धुंदी, अफूची तलफ या गोष्टींना त्यांच्या साहित्यात स्थान आहे. पण त्यांचे यथातथ्य चित्रण कोठेही आलेले नाही. त्यांच्या व्यक्तिरेखा शरीराला स्वयंभू महत्त्व देत नाहीत. तर अतृप्त आत्म्यांची धडपड चित्रित करण्याकडेच शरदबाबूंचा कल असलेला दिसतो. व्यक्तिरेखांच्या शारीरिक सुखांना ते महत्त्व देत नसले तरी शरीर आणि मन यांच्यातील गुंतागुंतीचे संबंध शरदबाबूंना माहीत आहेत. आणि अशा संबंधांचे चित्रण त्यांच्या अनेक कादंबऱ्यांतून आलेले दिसते. यावरून शरच्चंद्रांच्या सूक्ष्म अवलोकन शक्तीचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ 'बिंदूचे बाळ' या कथेत बिंदूला मूल न होणे ह्या एका शारीरिक घटनेचा तिच्या जीवनात झालेला परिणाम किती विविध प्रकारचा आहे, याचे आकलन त्या व्यक्तिरेखेवरून सहज होते.

शरदबाबूंच्या व्यक्तिरेखांत कितीतरी लहान मुले खेळताना, बागडताना व वावरताना दिसतात. या छोट्या मुलांचे त्यांनी केलेले चित्रण विलक्षण मनोवेधक आहे. शरदबाबूंनी निर्माण केलेल्या या लहान मुलांच्या व्यक्तिरेखा निष्पाप आहेत. ही लहान मुले हट्टी असली, बिघडलेली असली, तरी निष्पाप आहेत. शरदबाबूंच्या अनेक कादंबऱ्यांतून अशा मुलांवर आईऐवजी दुसरीच एखादी स्त्री गाढ प्रेम करताना दिसते आणि ह्या प्रेमाची उत्कटता ते वाचकांच्या हृदयाशी नेऊन भिडवताना दिसतात.

शरदबाबूंच्या व्यक्तिरेखा प्रथमदर्शनी अस्पष्ट वाटतात. त्यांचे बाह्यवर्णन शरदबाबू करत नाहीत. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा फार काळ लक्षात राहत नाहीत. म्हणजेच शरच्चंद्र चटर्जी व्यक्तिरेखांच्या बाह्यवर्णनात न रमता त्या व्यक्तिरेखांच्या अंतर्आत्म्याला साद घालताना दिसतात. ''शरदबाबूंच्या व्यक्तिरेखा ह्या स्वयंप्रकाशित ताऱ्यांसारख्या असतात. इतर व्यक्तिरेखांचे अस्तित्व त्यांच्यासाठी आवश्यक असतेच असे नाही. त्या व्यक्तिरेखा परस्पर स्वतंत्र असतात. त्या विशिष्ट मूल्ये घेऊनच उभी असलेल्या दिसतात.''[२] असे गंगाधर गाडगीळ म्हणतात, ते मान्य करावे लागते.

शरदबाबूंचे एकूणच व्यक्तिचित्रण हे वास्तववादी आहे. जास्त तपशील न देता अनपेक्षितपणे वाचकांना ते एखाद्या व्यक्तिरेखेच्या हृदयाच्या गाभ्यापर्यंत घेऊन जातात. शरदबाबूंचा हा वास्तववाद इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. इतरांना वस्तुनिष्ठता, वस्तुस्थिती म्हणजेच वास्तववाद अभिप्रेत आहे. शरदबाबूंचा हा वास्तववाद 'आत्मनिष्ठ वास्तववाद' (Subjective Realism) आहे. त्यांना व्यक्तिचित्रणात वस्तुनिष्ठ आणि वस्तुस्थिती यांचेच चित्रण करायचे असते, पण त्यांची पद्धती बाहेरून

आत येण्याची नसते; तर ते व्यक्तिचित्रणात आतून बाहेर येतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिचित्रण हे आत्मनिष्ठ वास्तववादाजवळ जाणारे असते.

मानवी अंत:करणाची सूक्ष्म भावस्पंदने आपल्या कादंबरीतल्या व्यक्तिचित्रणातून शरदबाबूंनी प्रभावीपणाने शब्दांकित केलेली आहेत. त्यांना कादंबरीतील व्यक्तिचित्रणे रंगवताना मानवी मर्यादांचे विलक्षण भान असल्याचे लक्षात येते. त्यांचे नायक बावणकशी साधूपुरुष नाहीत की त्यांचे खलनायक हे डांबराच्या पिपात बुचकळून काढलेले दुर्जन नाहीत. स्वार्थत्याग, मनोधैर्य, समजुतदारपणा आणि करुणा या गुणांचं दर्शन त्यांच्या साऱ्याच पात्रांनी वेगवेगळ्या प्रसंगाविशेषी घडवले आहे.

२.

मध्यमवर्गीय स्त्रियांचे वास्तव चित्रण करणे हे शरदबाबूंच्या साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्रियांची दु:खे, अमानुष रूढीमुळे होणारा त्यांच्या मनाचा कोंडमारा, त्यांच्या सूक्ष्म भावभावना, त्यांच्या वेदना आणि त्यांचे मानसिक संघर्ष याचे चित्रण शरदबाबू आपल्या अनेक कादंबऱ्यांतून करतात. हे सर्व चित्रण शरच्चंद्र चटर्जी यांच्या अनुभूतीच्या आणि प्रतिभाशक्तीच्या जोरावरच झाले आहे.

शरदबाबूंच्या भावूक व कनवाळू मनाचे दु:ख, सजग, संवेदनशील, हळव्या मनाच्या वेदना, तरल कल्पनाशक्ती, सूक्ष्म, सखोल, अचूक निरीक्षण, सामाजिक अन्यायाची चीड इत्यादी साहित्यिक प्रकृतीची वैशिष्ट्ये त्यांच्या या स्त्रीचित्रणातून प्रकर्षाने दिसून येतात.

शरदबाबूंनी केवळ तत्कालीन बंगाली स्त्री जीवनाचे निरीक्षण केले होते, सुख दु:खे पाहिली होती असे नाही. मानवजातीच्या सुरुवातीपासून स्त्रीचे कुटुंबातील स्थान, तिचे सामाजिक स्थान, त्यातून उद्भवणारी तिची सुख दु:खे यांचा त्यांनी किती सखोल आणि व्यापक अभ्यास केला होता, हे अनेक कादंबरीवरून लक्षात येते. अशा या स्त्रियांच्या सुख दु:खाने त्यांचे सारे मनोविश्व व्यापून टाकलेले दिसते.

स्त्री जातीचे हे मूक दु:ख त्यांनी आपल्या घरातच पाहिले होते. आपल्या आईचे जीवन, तिची असीम सहनशक्ती, अखंड सेवावृत्ती, त्याग, कठोर संयम, दारिद्र्यातही जागरूक असलेले दातृत्व या सर्वांचा परिणाम त्यांच्या मनावर झालेला दिसून येतो. यातूनच भारतीय संस्कृतीची शाश्वत मूल्ये त्यांच्या मनात खोलवर रुजलेली होती. त्यांच्या साहित्यातील काही प्रमुख स्त्री व्यक्तिरेखांचा आढावा घेतल्यास हे लक्षात येईल.

शरच्चंद्र चटर्जी यांच्या 'गृहदाह' या मराठीतील अनुवादित कादंबरीतील प्रमुख

व्यक्तिरेखा 'अचला' ही आहे. अचलेच्या मनातील संघर्ष आजच्या स्त्रीच्या मनातही चालू असलेला पाहावयास मिळतो. बदलत्या समाजरचनेत हा संघर्ष अजून तीव्र बनताना दिसेल, व्यापक रूप घेताना दिसेल.

अचलेचा हा मानसिक संघर्ष मोठ्या गुंतागुंतीचा आहे. तशी ती सत्प्रवृत्त आणि विचारी आहे. पण काहीशी भावनावश असलेली जाणवते. आपला पती महीम याच्याविषयी तिला आदर आहे. त्याच्याविषयी तिच्या अंत:करणात निष्ठा आहे; पण सुरेशविषयीसुद्धा तिच्या मनात प्रीती निर्माण झालेली दिसते. पतीविषयी आदर आणि पतीच्या मित्राविषयी प्रीती या दोन भावनांच्या संघर्षात तिचे मन हेलकावे खाते. या दोन भावनांचे द्वंद्व हे तिच्या मानसिक संघर्षाचे मूळ आहे. हे मूळ अनेक कारणांनी आणि विविध प्रसंगांनी वाढताना दिसते.

अचला ब्राह्मी कुटुंबात जन्मलेली आणि वाढलेली आहे. त्या समाजातले नवे विचार आणि पारंपरिक संस्कार यांच्यातला संघर्षही तिच्या या मानसिक संघर्षाच्या मुळाशी आहे. सुरेश याच्याशी अचलेची ओळख अनपेक्षितपणे होते. सुरेश महिमचा पूर्व इतिहास सांगण्यासाठी अचलेच्या घरी आलेला असतो. पण अचलेला पाहिल्यानंतर आणि अचलेशी बोलल्यानंतर सुरेशची जी भावावस्था आहे, ती पूर्णपणे वेगळी आहे.

शरदबाबूंच्या इतर कादंबऱ्यात व्यक्तिवर्णन येत नाही. परंतु 'गृहदाह'मधील अचला या व्यक्तिरेखेचे वर्णन करताना शरदबाबू तिच्या बाह्यांगाचे वर्णन अधिक अचूकपणे असे करतात. 'वय अठरा, वर्ण सावळा असला तरी उजळ, अंगकाठी सडपातळ, निरोगी, सुंदर चेहरा, डोळ्यात स्थिरबुद्धीची चमक' असे अचलेचे वर्णन शरदबाबूंनी केले आहे.

अचलेच्या सौंदर्यामुळे सुरेश तिच्या प्रेमात पडतो. परंतु अचला त्याच्याशी ज्याप्रकारे वागते, बोलते त्यावरून तिच्या ठिकाणी असलेला संयमपणा संपूर्ण कादंबरीत भरून राहिला आहे.

आपला नवरा गंभीर, अबोल आहे हे तिला माहीत आहे. पण सासरघरची व्यवस्था लावून द्यायला आलेली महिमची दूरची बहीण मृणाल हिच्याबरोबर महीम मोकळेपणाने बोलतो. याचा तिला राग आलेला दिसतो. एवढेच नव्हे तर महिमशी तिचे लग्न होणार होते हेही मृणालकडून थट्टेच्या बोलण्यात अचलेला कळते. त्यावेळी स्वाभाविकच तिच्या मनात मृणालविषयी सूक्ष्म मत्सर आणि संशय येतो. आपल्यावर महिमचे प्रेम नाही, आपण दुर्लक्षित आहोत ही समजूत तिला व्यतित

करते. त्यामुळे तिच्या संयमाला तडा जाऊन तिच्या प्रेमपिपासू हृदयाची तडफड होते. तिच्या बोलण्यात कटूता येऊ लागते. महिमशी भांडण होते. अशा वेळी सुरेशच्या मनमोकळ्या बोलण्याने आणि भावनाशील वागण्याने तिच्या मनावर वेगळाच परिणाम होऊन तिचे मन सुरेशकडे वळते. अचला आणि सुरेश यांच्यातील गुप्त प्रेम वाढत जाताना दिसते. याची सर्व जाणिव महिमला आहे. पण त्याच्या विशिष्ट तत्त्वनिष्ठेमुळे तो उदासीन झाला आहे. त्याच्या या उदासिनतेमुळे अचलेचे मन व्याकूळ होते. नवऱ्याचा हा गंभीरपणा, संयमपणा अचलेला त्रासदायक वाटू लागतो. या त्रासातूनच ती महिमला सोडून जाण्याचा विचार करते. नवऱ्याच्या अशा वागण्यामुळेच अचला 'लग्नाला' नुसता व्यवहार आहे असे म्हणते.

स्त्रीला पतीकडून प्रेमाचा आविष्कार हवा असतो. त्या ओलाव्यावरच तिची जीवनवेल जगत असते. पण पतीच्या हृदयातले प्रेम जर आत्मनिष्ठेच्या आणि कठोर तत्त्वज्ञानाच्या दगडाखाली दडपूण गेले; तर स्त्रीचे मन करपून जाते. प्रेमपिपासू हृदय अतृप्त राहते. अचलेच्या बाबतीत हेच घडते.महिम व तिच्यामधला हा संघर्ष वाढतच जातो. सुरेशच्या सान्निध्यात ती हा ओलावा मिळवू पहाते. त्याला उत्तेजन देत राहते. त्याच्या प्रेमप्रवाहात वेगाने वाहत जाते. आणि दोघेही एका अज्ञात स्थळी पती पत्नीच्या नात्याने राहतात.

परंतु सुरेशसारख्या उच्छशूल तरुणाच्या मनातील तिच्याविषयी असणारा आवेग संपतो. हे अचलेच्या लक्षात येते. तिला आपण महिमशी किती विश्वासघात केला आहे, याची जाणीव होते व शेवटी ती परत महिमजवळ येते. अशा प्रकारे शरदबाबू अचलेच्या मानसिक संघर्षाची सुटका करून अचलेला न्याय देताना दिसतात.

'शेषप्रश्न' या मराठीतील अनुवादित कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणून 'कमल'कडे पाहता येईल. संपूर्ण कादंबरीत कमलचं प्राधान्य आणि प्राबल्य एवढं आहे की, इतर सर्व स्त्री, पुरुष व्यक्तिरेखा 'कमल' या व्यक्तिरेखेपुढे गौण ठरतात.

कमलचा जन्म आसामच्या चहाच्या मळ्यात झाला. वडील युरोपियन, आई त्याच्या घरची हिंदू नोकर, त्यामुळे तिच्या ठिकाणी पाश्यात्त्य व पौर्वात्य संस्कृतीचा संकर झालेला आहे. तिथेच तिचे बालपण गेले आहे. एका भारतीय ख्रिश्चनाबरोबर तिचे लग्न झालेले असते. थोड्याच दिवसात तिच्या नवऱ्याचा मृत्यू होतो. त्यानंतर ती एका प्रोफेसरशी पुनर्विवाह करते. येथूनच तिचा समाजाशी बंडखोरी करण्याचा प्रवास सुरू होतो. परंतु तो प्रोफेसरसुद्धा तिचा त्याग करतो.

आसामच्या मळ्यापासून दिल्ली-आग्रापर्यंतचे जे जग तिने पाहिलेले आहे,

चारगावचे पाणी तिने चाखले आहे, वैफल्य भोगले आहे. यातून तिची वाढ बुद्धिवादी झाली आहे. या वैफल्याने खचून न जाता ती आपल्या ह्या बुद्धिवादी वृत्तीमुळे बंडखोर बनते. या सगळ्यामुळे तिचा जीवनाचा दृष्टिकोन भिन्न प्रवृत्तीचा बनलेला आहे. जीवनाची तत्त्वे तिने स्वानुभवावर निश्चित केलेली आहेत. आपल्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर ती त्या आत्मकेंद्रित तत्त्वांना सामाजिक रूप देऊ पाहते आहे. नवनव्या संस्कृतीची, समाज परिवर्तनाची दिशा दाखवू पाहत आहे.

तिच्या लेखी भारतीय संस्कृतीतील पवित्रता, ब्रह्मचर्य, संयम वगैरे आदर्श जुनाट आहेत. अविकसित मनाचा तो संकुचितपणा आहे. या निरर्थक गोष्टींनी माणसाचे जीवन दुर्बल आणि पंगू बनवले आहे, जीवनाचे सौंदर्य नष्ट केले आहे.

१. 'श्रद्धेला निष्ठेला पाट्यावर वाटायच्या वरवंट्यापेक्षा जास्त किंमत नाही. एकनिष्ठ प्रेम ही मानसिक दुर्बलता आहे.'

२. 'तारुण्यातला संयम म्हणजे केवळ अवडंबर.'

३. 'आत्मनिग्रहाच्या अभिमानामुळे आध्यात्मिकता क्षीण होत जाते.'

४. कोणत्यातरी एका विशिष्ट देशात जन्म घेतला म्हणून त्या देशाच्या आचारविचाराच्या पकडीत सदोदीत अडकून कशाला राहायचं? जाईना का ते वैशिष्ट्य नष्ट होऊन! भारतीय संस्कृतीपेक्षा एक मानवीय संस्कृती अधिक महत्त्वाची.'[३] असे कमलचे संवाद तिच्या बुद्धिमत्तेची ओळख करून देतात.

स्वानुभवावरून ठाम बनलेल्या तत्त्वांसाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर, आततायीपणे भारतीय तत्त्वांनाच नव्हे तर जागतिक शाश्वत मूल्यांना ती वादविवादात उधळून लावताना दिसते. तिच्या बुद्धीची कसरत आणि प्रत्युत्तरांची आतषबाजी स्तिमित करणारी आहे व कित्येक प्रसंगी निरुत्तर करणारी देखील आहे. प्रत्येक गोष्टीवर हल्ला चढविणे आणि पुरुषांना वादात पराजित करणे, ही तिची जिद्दच असल्याची जाणवते.

तिचा मुख्य विरोध लग्नबंधनाला आहे. बंधन विरहित जीवन ही तिच्या जीवनाची प्रेरणा आहे. ती मुक्त प्रेम मानणारी आहे. प्रेमी स्त्री पुरुषांनी एकत्र राहावे, प्रेम संपले की दोघांनी आपआपल्या दिशांना निघून जावे. आसक्तीचे सुख हवे; पण सहवासाचे बंधन नको.'अशी तिची विचारसरणी आहे. म्हणूनच शिवनाथ तिला सोडतो, तेव्हा तिला दुःखही होत नाही अगर तिला त्याचा रागही येत नाही. प्रेम संपले, व्यवहार संपला. वर्तमानकालीन परिस्थितींचा विचार करून जगणे तिला पसंद आहे. भूतकाळाकडे वळून बघणे आणि भविष्यकाळाचा विचार करणे म्हणजे निव्वळ

मूर्खपणा आहे, असे तिला वाटते.

शिवनाथशी संबंध तोडल्यावर राजेनशी मैत्री जमविण्याचा ती प्रयत्न करते. त्याच्याशी वादविवाद करते. त्याच्याकडून मिळालेल्या उत्तरामुळे ती पराजित होते. तिचा भ्रमनिरास करणारा एकतरी तरुण तिला भेटतो. आजवर तिला आपण सुंदर आहोत. सुशिक्षित आहोत. पुरुष आपल्याकडे सहज ओढले जातात. असा अभिमान वाटत होता. पण राजेनने तिचा हा अभिमानाचा बुरखा सहज फाडून तिच्या दैन्याची लक्तरे तिच्या भोवतीच पेरून दिली आहेत. पण ती सहसा पराजित होणारी नाही. ती पुन्हा एकदा अजितशी मैत्री जोडते. तो तिच्या मानी आणि बुद्धिवादी विचारसरणीकडे आकर्षित होतो. तिच्याशी लग्न करण्याची त्याची इच्छा निर्माण होते. परंतु कमल ही लग्नविरोधी विचारसरणीची असल्याने लग्न ही गोष्ट तिच्या सर्व बंधुमक्त तत्त्वात बसत नाही. कादंबरीच्या शेवटी ती अजितला घेऊन मुक्तपणे संचार करण्यासाठी निघून गेलेली दिसते.

'कमल ही आजच्या पुरोगामी, स्वतंत्र, सर्व बंधन मुक्त होऊ इच्छिणाऱ्या स्त्रीची अग्रदूत आहे.'[४] असे म्हणायला हरकत नाही. प्रतिभावंत साहित्यिक कसा द्रष्टा असतो हे शरदबाबूंच्या कमल या व्यक्तिरेखेतून दिसून येते.

'देवदास' या मराठीतील अनुवादित कादंबरीची नायिका म्हणून 'पार्वती'(पारू) कडे पाहता येईल. एका लहानशा गावातील सर्वसामान्य मुलगी. ती देखणी असेलही पण तिने केलेले अलौकिक प्रेम, पराकोटीचा त्याग, टोकाची सहनशीलता, त्या काळातील मुलांमध्ये अभावानेच दिसणारा धीटपणा, लहान वयातच आलेली प्रगल्भता या गुणांमुळे ती असामान्य ठरते.

निलकंठ चक्रवर्ती या ब्राह्मण गृहस्थाची पार्वती ही मुलगी असून लहान वयातच ती समजुतदार असलेली दिसते. देवदास चोरून हुक्का ओढतो, हे तिला माहीत असूनही त्याला शिक्षा होऊ नये म्हणून तिने कोणालाही सांगितलेले नाही. एका प्रसंगात देवदासने वेताच्या काठीने पार्वतीला व्रण उठेपर्यंत मारलेले असूनही पार्वती घरी देवदासचे नाव न सांगता गुरुजींचे नाव सांगते. परिणामी पार्वतीची शाळा बंद होते.

शिक्षणासाठी कलकत्याला गेलेल्या देवदासविषयी पार्वतीच्या मनातील भावावस्था येथे प्रत्ययकारीरीत्या आलेली आहे. देवदास पहिल्यासारखा आपल्याशी वागत नाही, याचे दुःख सतत तिच्या मनात बोचत राहते. लहानपणापासून पार्वती देवदासवर फक्त आपलाच अधिकार आहे, असे समजत आलेली आहे. पण

समाजातील उच्च-नीच्चतेमुळे देवदासशी आपले लग्न होऊ शकत नाही, हे समजताच तिने पाहिलेल्या स्वप्नांचा चक्काचूर होताना दिसतो. पार्वती स्वाभिमानी, तितकीच अहंकारी आहे. देवदास माफी मागायला आला असताना ती त्याला क्षमा करत नाही. पार्वती त्या काळातील स्त्रियांपेक्षा खंबीर आणि धीट असलेली दिसते. तिचा हा धीटपणा रात्री देवदासच्या घरी जाणे, त्याला लग्न करणार आहेस का, असा सरळ प्रश्न विचारणे यावरून लक्षात येतो. देवदासने नकार दिल्यानंतर पार्वती कोणताही त्रास करून न घेता ती सधन संपन्न अशा, आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्या भूवन चौधरीशी लग्न करते. सासरी आल्यानंतर तिच्यावरील जबाबदारी वाढलेली आहे. ती जबाबदारीसुद्धा ती व्यवस्थितपणे पार पाडते. भूवन चौधरीची मोठी मुलगी यशोदा ही घरी येण्यास तयार नाही. तेव्हा स्वतः पार्वती तिला घरी आणते व तिच्या काय अपेक्षा आहेत, तिला काय हवे आहे ते सर्व देऊन कुटुंबात असणारे ताणतणाव दूर करते. याठिकाणी लहान वयातच पार्वतीजवळ आलेल्या समंजसपणाचे आणि समाजव्यवहाराचे दर्शन घडते.

देवदासवरील आपले प्रेम तिने कोठेही नाकबूल केलेले दिसत नाही. देवदासला चूक लक्षात आल्यानंतर त्याची जी वाताहत होत आहे, त्या वाताहतीतसुद्धा ती देवदासवर तितकेच प्रेम करते. आजारी आणि दारूच्या आहारी गेलेल्या देवदासला समाजाचा कोणताही मुलाहिजा न राखता पार्वती स्वतः पालखी करून आणण्यास जाते. लहानपणापासून तिने पाहिलेले स्वप्न ती आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर जगू पाहते.

लहानपणापासून देवदासवर खूप प्रेम करणाऱ्या पार्वतीला सामाजिक परिस्थितीमुळे जरी दुसऱ्याशी लग्न करावे लागले असले; तरी ती मनातून खूप दुःखी आहे. तिची ओढ आजही देवदासकडे आहे. तरीही भूवन चौधरीची पत्नी म्हणून जगत असताना तिने आपला कोठेही तोल ढळू दिलेला दिसत नाही. तिचे हे सांस्कृतिक अंगच शरदबाबू प्रस्तुत कादंबरीतून समग्रपणे चितारताना दिसतात. पार्वतीने केलेला त्यागच तिला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातो.

'चरित्रहीन' या मराठीतील अनुवादित कादंबरीतील शरदबाबूंची सावित्री ही व्यक्तिरेखा ज्याप्रमाणे इतर कलाकृतीत शोधता येते, तशी शरदबाबूंची 'किरणमयी'ही व्यक्तिरेखा इतर कादंबरीत शोधता येत नाही. फक्त चरित्रहीन, विधवा म्हणून किरणमयीला समजावून घेणे खूप अवघड आहे. किरणमयी ही व्यक्तिरेखा म्हणजे शरच्चंद्र चटर्जी यांच्यातील कलावंताच्या निर्मितीचे एक आगळेवगळे विलक्षण रूपच

आहे, असे म्हणता येईल.

असामान्य सौंदर्य, पराकोटीची मनस्वी वृत्ती, प्रखर बुद्धिमत्ता आणि या सर्वांवर अकाली लादले गेलेले पांडित्य यातून किरणमयीचे व्यक्तिमत्त्व साकार होते. किरणमयीच्या सौंदर्याचे असामान्यत्व संपूर्ण कादंबरीभर जाणवत राहते. तिला पाहणारा प्रत्येक पुरुष तिच्या विलक्षण सौंदर्याने भारावून जातो.

"असं पहा, माझ्या मताला फारशी काही किंमत नाही, पण थोडीबहुत असेल तर मी असं म्हणेन की, तुमच्यासारखं रूप जगात कुठं सापडायचंच नाही."[५] या सतीशच्या उद्गारावरून तिच्या सौंदर्याचा प्रत्यय येतो.

किरणमयीला प्रथमच पाहताना सरोजिनीसारखी स्त्रीही विलक्षण थक्क होऊन जाते. समाजात मोकळेपणाने मिसळण्याची सवय असलेल्या सरोजिनीची जीभही त्या अद्वितीय विधवा स्त्रीसमोर अडखळते. स्वतःच्या सौंदर्याच्या वेगळेपणाची आणि असामान्यत्वाची जाणीव किरणमयीला असलेली दिसते.

किरणमयी वृत्तीने पराकोटीची मनस्वी आहे. अशा या मनस्वीपणातून तिचा विविध ठिकाणी तोल जातो. कोणत्याही भावनेच्या टोकाला जाण्याची तिची प्रवृत्ती आहे. तिच्या या विलक्षण वृत्तीतूनच विविध वादळे, गैरसमज निर्माण होतात. उपेंद्राविषयीच्या प्रेमाने तिच्या अंतर्मनात निर्माण होणारी वादळे तिच्या मनस्वीपणाचे प्रतीक आहेत. ज्या मोहनशी तिने एकेकाळी शरीरसंबंध ठेवला होता, त्याला त्याच प्रेमशोधाच्या भावनेच्या जोरावर ती चुटकीसरशी घालवून देते.

किरणमयी प्रखर बुद्धिमान आहे. याची प्रचिती तिने दिवाकराशी केलेल्या संवादावरून येते. किरणमयी हे स्वतःच्या लोकविलक्षण सौंदर्याचे, मनस्वीपणाचे, प्रखर बुद्धिमत्तेवर लादलेल्या पांडित्याच्या ज्वालेत स्वतःच उद्ध्वस्त झालेले अजोड चित्र आहे. तिच्या या उद्ध्वस्त होण्याच्या प्रक्रियेने 'चरित्रहीन'मधील अनेक संदर्भ झाकाळून गेलेले आहेत. सर्व संदर्भांची जागा किरणमयीच्या लोकविलक्षण ज्वालेच्या भीषण अंताने व्यापलेली आहे. किरणमयी हे न पेललेल्या पांडित्याचे, मनस्वीवृत्तीचे आणि सौंदर्याचे प्रतीक आहे, असे मला वाटते. किरणमयीच्या शरीरातील मनस्वी, बुद्धिमान आत्म्याने तिच्या शरीराची ससेहोलपट केलेली आहे. अंततः तिचा आत्माही बधिर झालेला वाटतो.

विधवा किरणमयीचे उपेंद्रवर प्रेम आहे. ते प्रेम उघडपणे व्यक्त करण्याचे अथवा तो क्षण पकडून आपली उर्मी व्यक्त करण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी असलेले दिसते. स्वतःच्या निरस नवऱ्याबरोबर संसार करताना आपल्यात रसिकता आहे की नाही,

याचाच तिला प्रश्न पडतो. त्याचे उत्तर तिला उपेंद्रात सापडते.

प्रेम करण्याची अथवा प्रेम करून घेण्याची आपली क्षमता इतर कोणत्याही तरुणीपेक्षा कमी नाही याची जाण किरणमयीला आहे. आपल्या या आगळ्या प्रेमाची अथवा त्याच्या विफलतेची जाण तिला आहे. सुरबालेवर उपेंद्रचे किती प्रेम आहे, त्याच्या मनात तिच्यासाठी किती जागा आहे, याचा प्रत्यय तिने घेतलेला आहे. सुरबालेविषयी आपल्याला द्वेष वाटत नाही, ती आपली चूक आहे, असे ती म्हणते. पण हृदयाच्या अंतर्हृदयात कुठेतरी सुरबालेला पराभूत करण्याची ईर्षा तिच्यात असलेली जाणवते. कोवळ्या वयाच्या दिवाकरला मोठ्या मायेने ती स्वत:कडे ठेवून घेते. किरणमयी-दिवाकर संबंधात उपेंद्राने हीन संशय व्यक्त केल्यावर तिचा चेहरा विवर्ण होतो. उपेंद्राने तिची निर्भर्त्सना केल्यानंतर ती सुडाने पेटून उठते. या सुडाचा प्रवास भयावह आहे. दिवाकर सारख्या विनीत, सत्यवादी आणि दुबळ्या मनाच्या कोवळ्या पुरुषातील पौरुषाला ती जाग आणून देते. त्याच्या दुबळ्या मनाच्या सर्व वाटा बंद करते. सुडाच्या या अतिरेकी भावनेपोटी शरीर आणि मन यांच्यातल्या संघर्षाला तिला सामोरे जावे लागते. या संघर्षातून किरणमयी जळताना दिसते. भग्न होत जाते. किरणमयीच्या सौंदर्याची लक्तरे होत आहेत. स्वत:च निर्माण केलेल्या संकटात तिचे ज्वालामय व्यक्तित्व हादरून जाते. किरमयी हताश झालेली दिसते, स्वत:च्या फसवणुकीतून झालेल्या जखमांनी ती छिन्नविछिन्न झालेली दिसते. त्यातच कामिनी तिचा उल्लेख वेश्या असा करते. त्यामुळे तर ती कोसळून पडते. सतीश तिला घरी घेऊन जाण्यासाठी आला आहे. पण सावित्री तिला स्वीकारायला तयार होत नाही. अशा प्रकारे तिच्यावर आघात होत राहतात आणि त्यातच तिला वेड लागते. तिच्या आत्म्याच्या बधिरतेचा प्रवास पूर्ण झालेला दिसतो.

'चरित्रहीन' या कादंबरीचा संपूर्ण भाग किरणमयीच्या सौंदर्याच्या, रसिकतेच्या, बुद्धिमत्तेच्या भीषण अंताने, तिच्या मनाच्या बधिरावस्थेने व्यापलेला दिसतो. तिचा हा बधिरावस्थेतला प्रवास शरदबाबू अत्यंत संयमाने चित्रित करतात.

तो तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतो. तिचा नवऱ्याविषयी असणारा आदर दुखावला जाऊन विराज नवऱ्याला सोडून जाते. गावोगाव भिक्षा मागत फिरते. आपल्या चुकीला नवरा क्षमा करेल की नाही या विचारातच ती गावोगाव फिरत आहे. पण पतीच्या ठायी असणारे दातृत्व लक्षात येताच ती परत आपल्या नवऱ्याकडे येण्यासाठी आतुर झालेली आहे. या ओढीतच तिचा मृत्यू होतो.

विराजसारख्या स्वाभिमानी, पतीनिष्ठ स्त्रीचा गरिबीने घेतलेला बळी संपूर्ण शरद

साहित्यात प्रकर्षाने जाणवतो. शरदबाबूंनी विराज-वहिनीच्या व्यक्तिरेखेतून तत्कालीन स्त्री आणि तिचे दुःख याचे सांगोपांग चित्रण केले आहे.

याचबरोबर शरच्चंद्र चटर्जी यांनी निःस्वार्थी प्रेम करणारी ललिता, विधवा दुर्गामनी, अविवाहित संध्या, कर्तव्यपरायण विजया, पतिनिष्ठ सविता अशा स्त्री व्यक्तिरेखांच्या चित्रणातून तत्कालीन समाजाचे आणि तेथील आचार विचारांचे दर्शन घडविले आहे.

३.

शरच्चंद्र चटर्जी यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्री हा घटक केंद्रबिंदू असून स्त्रीची विविध रूपे त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून रेखाटली आहेत. विधवा स्त्री हा तर त्यांच्या चिंतनाचा विषय असलेला दिसतो. विधवा स्त्रीचे दुःख त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून उत्तमरीत्या चित्रित केले आहे. दारिद्र्य हा एक त्यांच्या अभ्यासाचा विषय असून दारिद्र्याने कुंठित झालेल्या समाजाचे, स्त्रीचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून आले आहे. समाजाने अव्हेरल्यामुळे बंडखोर बनलेल्या स्त्रीचे चित्रणही ते करतात. शरच्चंद्र चटर्जी यांचे कादंबरीतील स्त्रीचित्रण हे साचेबंद नसून व्यक्तिचित्रणाच्या कृत्रिम संकल्पना बाजूला ठेवून समाजाच्या विविध स्तरातील, व्यवसायातील स्त्रियांचे चित्रण त्यांनी केले आहे. स्त्रियांचे हे चित्रण त्यांच्या व्यापक सहानुभाव आणि मानवतावादी भूमिकेतून आले आहे. स्त्रीचित्रण करताना ते बाह्यांगापेक्षा त्या व्यक्तिरेखेच्या अंतरंगाचे दर्शन घडवितात. हे अंतरंग ते बारीक-सारीक तपशीलातून साकार करतात. शरच्चंद्र चटर्जी यांना स्त्रीचित्रणात वस्तूनिष्ठ आणि वस्तुस्थिती यांचेच चित्रण करावयाचे असते, पण त्यांची पद्धती बाहेरून आत येण्याची नसते तर, ते आतून बाहेर येतात. त्यामुळे त्यांचे स्त्रीचित्रण हे आत्मनिष्ठ वास्तववादाजवळ जाणारे आहे. एकूणच शरच्चंद्र चटर्जी यांच्या कादंबरीतील स्त्रीचित्रणात त्यांच्याजवळ असणाऱ्या सूक्ष्म अवलोकन शक्तीचा आणि जीवनाकडे बघण्याच्या सूक्ष्म आणि गंभीर दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो.

**निष्कर्ष**

१) शरच्चंद्र चटर्जी यांच्या कादंबऱ्या तत्कालीन काळातील सामाजिक, राजकीय विचारसरणीची पार्श्वभूमी उलगडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.

२) शरच्चंद्र चटर्जी यांनी मानवी अंतःकरणाची सूक्ष्म भावस्पंदने व्यक्तिचित्रणातून प्रभावीपणाने शब्दांकित केलेली आहेत.

३) शरच्चंद्र चटर्जी यांनी स्त्रीची विविध रूपे आपल्या कादंबऱ्यांमधून रेखाटली आहेत.


ISSN No. 2319-6025

४) दारिद्र्य हा एक त्यांच्या अभ्यासाचा विषय असून दारिद्र्याने कुंठित झालेल्या समाजाचे, स्त्रीचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून आले आहे.

५) समाजाने अव्हेरल्यामुळे बंडखोर बनलेल्या स्त्रीचे चित्रणही आपल्या कादंबऱ्यात शरच्चंद्र चटर्जी करतात.

६) शरच्चंद्र चटर्जी यांचे कादंबरीतील स्त्रीचित्रण हे साचेबंद नसून व्यक्तिचित्रणाच्या कृत्रिम संकल्पना बाजूला ठेवून समाजाच्या विविध स्तरातील, व्यवसायातील स्त्रियांचे चित्रण त्यांनी केले आहे.

७) स्त्रियांचे व्यक्तिचित्रण त्यांच्या व्यापक सहानुभाव आणि मानवतावादी भूमिकेतून आले आहे.

८) स्त्रीचित्रण करताना ते बाह्यांगापेक्षा त्या व्यक्तिरेखेच्या अंतरंगाचे दर्शन घडवितात. हे अंतरंग ते बारीकसारीक तपशीलातून साकार करतात.

९) शरच्चंद्र चटर्जी यांचे स्त्रीचित्रण हे आत्मनिष्ठ वास्तववादाजवळ जाणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) गाडगीळ, गंगाधर - 'समीक्षामीमांसा', प्रथम आवृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, १९९३.

२) मुक्तीबोध, शरच्चंद्र - 'शरच्चंद्र : एक दर्शन', नवभारत प्रकाशन, मुंबई, १९८०.

३) चटर्जी, शरच्चंद्र - 'शेषप्रश्न', (अनुवाद - मामा वरेरकर), नवभारत प्रकाशन, मुंबई

४) मुक्तिबोध, शरच्चंद्र - उनि, पृ. १०४

५) चटर्जी, शरच्चंद्र - 'चरित्रहीन', (अनुवाद - मामा वरेरकर), नवभारत प्रकाशन, मुंबई

❒❒❒